महानिर्मिती खापरखेडा वीज केंद्र

प्रेसनोट ; ४ जानेवारी २०१८

**<u>३१७ पिशव्या रक्तदान करून खापरखेडा वीज केंद्राने जोपासली सामाजिक बांधिलकी</u>**

- ***पथनाट्य व मॅस्कट "तेजस"ची किमया***
- ***महानिर्मितीत महत्तम रक्तदानाचा नवा विक्रम***
- ***वर्धापन दिन कार्यक्रमांना महारक्तदानाने प्रारंभ***

खापरखेडा : महानिर्मितीच्या राज्यभरातील वीज केंद्रांमधील महत्तम रक्तदानाचा नवा विक्रम खापरखेडा वीज केंद्राने प्रस्थापित केला. मागील सात दिवसांपासून पथनाट्य, मॅस्कट तेजस आणि वर्धापन दिन समितीच्या सदस्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे खापरखेडा परिसरात मोठ्या प्रमाणात सामाजिक जागृती झाली व त्याचा हा परिपाक असल्याचे प्रतिपादन राजेश पाटील यांनी व्यक्त केले.

महानिर्मितीच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने २८ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिरीचे आयोजन वीज केंद्राच्या दवाखान्यात केले. शिबिराचे उदघाटन राजेश पाटील मुख्य अभियंता खापरखेडा वीज केंद्र यांचे हस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे त्यांनी स्वत: रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला.

रक्तदान हे श्रेष्ठदान असल्याने गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या जाणीवेतून खापरखेडा वीज केंद्राच्या अधिकारी, कर्मचारी, कामगार, कंत्राटदार,कंत्राटी कामगार यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून ३१७ पिशव्या रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र, डोनर कार्ड, भेटवस्तू थर्मास, चहा-कॉफी-बिस्कीट अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने देण्यात आले.

रक्तपेढ्यांतील दूषित रक्तामुळे रुग्णांना होणारा आजारांचा संसर्ग टाळण्यासाठी 'एलायझा' या रक्तचाचणीचा वापर केला जात होता, मात्र ही तपासणी एचआयव्ही, हेपॅटायटीस बी यांसारख्या आजारांच्या पहिल्या टप्प्यातील संसर्गाचे निदान करण्यास निष्फळ ठरत असल्याने रक्तपेढ्यांमध्ये 'नॅट' या अत्याधुनिक रक्तचाचणीचा निर्णय शासनाने घेतला. परंतु यासाठीचा खर्च मोठा होता, आता मात्र आजारांचा वाढता संसर्ग पाहता 'नॅट' चाचणीला विशेष महत्व प्राप्त झाले असल्याचे हेडगेवार रक्तपेढीचे डॉ.पी.जी.अनसिंगकर यांनी सांगितले.याप्रसंगी हेडगेवार रक्तपेढीचे श्रीकांत विंचूर्णे, हरिभाऊ इंगोले, यांनी रक्तदान समज-गैरसमज, रक्तदानाचे फायदे, रक्तदात्याला फायदे, नॅट चांचणी/सुरक्षित रक्त इत्यादीबाबत उपस्थितांना उपयुक्त माहिती सांगितली व रक्तदानाच्या चळवळीबद्दल इतरांना सांगण्याबाबत आवाहन केले रक्त संकलानाकरिता हेडगेवार रक्तपेढीची चमू अत्याधुनिक साधनसामग्रीसह उपस्थित होती.

याप्रसंगी उप मुख्य अभियंते राजेंद्र राऊत, प्रदीप फुलझेले, डॉ.मिलिंद भगत व दवाखाना चमू, हेडगेवार रक्तपेढीचे सचिव अशोक पत्की, प्रकाश कुंडले,दीपक बडकस, खापरखेडा वीज केंद्राचे नंदकिशोर पांडे, पुरुषोत्तम वारजूरकर, राजेश चिवाणे, भास्कर शेगोकार,विजय अढाउ यशवंत मोहिते, पुरुषोत्तम मानकर विजय मोहोड,विनायक पाटील,राहुल वांधे,रुपल टेकाडे,शंतनू जोशी,राखी नागरकर,सतीश ढोले,हर्षल येवले,प्रफुल्ल वानखेडे,कोमल गोंगाडे,सुवर्णा येवले,पांडुरंग नखाते,जयंत ओकटे,नरेश भट्टी,नरेंद्र वंदनकर, वीज केंद्राचे अधिकारी,अभियंते,तंत्रज्ञ,कर्मचारी,कंत्राटदार,कंत्राटी कामगार, कुटुंबीय इत्यादींचे मोलाचे योगदान लाभले.